## नि.क्र. १ व १५ वरील आदेश

( दिनांक ०९.०७.२०२४ रोजी पारित)

प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्र. १ यांनी त्यांचे प्रकरण आरोपी क्र. २ पासून वेगळे चालविण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जास अभियोग पक्षातर्फे म्हणणे दाखल करुन सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचे प्रकरण या न्यायालयात दिनांक १८.०५.२०२१ रोजी दाखल झाले आहे. सदर प्रकरणी माझे पुर्वाधिकारी यांनी दिनांक १८.०५.२०२१ रोजीच्या आदेशान्वये आरोपींविरुध्द आदेशिका काढण्याचा आदेश केला होता. त्यानंतर दिनांक १२.०४.२०२२ रोजी या प्रकरणी आरोपी क्र. १ हा हजर होऊन त्याने जामीनपत्रे दाखल केली. आरोपी क्र. २ याला जमानती वॉरंट पाठविण्यात आला होता. परंतु त्याची बजावणी न झाल्याने तो अदम तामील परत आला. त्यानंतर आरोपी क्र. २ यास कलम ८२ व ८३ प्रमाणे जाहीरनामा काढण्यात आला. परंतू आजतागायत या प्रकरणी त्याची बजावणी झालेली नाही. त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण सन २०२१ पासून आरोपी क्र. २ याच्या गैरहजेरीमुळे प्रलंबित आहे. सबब या परिस्थितीत आरोपी क्र. १ यांना विनाकारण या प्रकरणी विनासुनावणी हजर राहण्यास सांगणे हे त्यांचे खटला जलदगतीने चालवण्याच्या अधिकारास बाधा आणणारे आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१७ नुसार न्यायालयाला

आरोपीविरुध्द खटला स्वतंत्र चालविण्याची शक्ती प्रदान आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य होईल. सबब, आदेश.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. १५ मंजूर करण्यात येतो.

२. आरोपी क्र. १ यांचे विरुध्द सदरचे प्रकरण स्वतंत्रपणे चालविण्यात येते.

Pratik Ganesh Lambe
Digitally signed by Pratik Ganesh Lambe
Date: 2024.07.09 17:39:02 +0530

( पी. जी. लंबे )
दिनांक ०९.०७.२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
गोंडपिपरी.